## निशाणी क्र. २० वरील आदेश

१. प्रस्तुतच्या अर्जान्वये प्रतिवादी नं.३ यांनी त्यांची कैफियत No Say, No W.S. माफ होऊन सदरकामी समाविष्ट करून घेणेबाबत विनंती केली आहे. वादी यांनी प्रतिवादीविरुध्द निरंतर ताकीदीबाबत दावा दाखल केला आहे. सदर प्रतिवादी नं.३ यांना सदर जमीन मिळकत बाबतची महत्वाची कागदपत्रे वेळेत उपलब्ध न झालेमुळे तसेच वादीने काही प्रॉपर्टी दाव्यापुर्वी तबदिली केलेल्या मिळकतीबाबतची कागदपत्रे उपलब्ध न झाल्यामुळे सदर दाव्याचे कामी मुदतीत कैफियत देता आली नाही. त्यामुळे मे. कोर्टसो यांनी सदर दाव्याच्या कामी दि. २१/०१/२०२३ रोजी सदर प्रतिवादी नं.३ यांचेविरुध्द No Say, No W.S. चा आदेश केलेला आहे. माफ होऊन कैफियत दाखल करुन घ्यावी अशी विनंती केली.

२. सदर प्रतिवादी नं.३ यांनी मुद्दामहुन अथवा जाणुनबुजून सदर दाव्याच्या कामी कैफियत देण्यास टाळाटाळ केलेली नव्हती व नाही. सदरील प्रतिवादी नं.३ यांना काही महत्वाची जुनी कागदपत्रे, जुने फेरफार व खरेदी दस्त वेळेत न मिळाल्यामुळे सदरकामी मुदतीत कैफियत देणे अडचणीचे झाले होते. प्रतिवादी नं.३ यांना कायद्याची कोणतीही माहिती नव्हती व नाही व कायद्याचे अज्ञान असल्यामुळे कैफियत न दिलेस होणारे परिणामाची माहिती नव्हती. त्यामुळे वेळेत कैफियत दाखल करता आली नाही. तसेच प्रतिवादी शेतकरी असल्याने या दाव्यातील पुढील झालेल्या तारखा कळल्या नसल्याने वेळेत कैफियत देता आली नाही. सदर प्रतिवादी नं.३ विरुध्द झालेला No Say, No W.S.

आदेश रद्द होणे नैसर्गिक न्यायाच्या दृष्टीने महत्वाचे व गरजेचे आहे. सदर अर्ज मंजुर झालेस सदरचा दावा गुणदोषावर चालुन न्यायदान करणेस मदतच होणार आहे, याउलट सदरचा अर्ज मंजुर न झालेस सदर प्रतिवादी नं.३ यांचे कधीही कशानेही भरुन न येणारे अपरिमित असे कायमचे नुकसान होणार आहे व सदरील प्रतिवादी नं.३ यांना सदर मिळकतीत असणा-या न्यायहक्कास मुकावे लागणार आहे. तरी मे. कोर्टासो यांनी प्रतिवादी नं.३ यांचेविरुध्द झालेला No Say, No W.S. चा आदेश रद्द करुन प्रतिवादी नं.३ यांची कैफियत सदर दाव्याचे कामी दाखल करुन घेणेस विनंती केली.

२. वादी यांनी नि.२० खाली स्वतःचे म्हणणे दाखल करून अर्जास विरोध दर्शविलेला आहे. त्यांच्या मते सदर अर्जातील संपुर्ण मजकुर खोटा व लबाडीचा आहे. अर्जातील कारण योग्य नाही. त्याबाबत विलंबास कारण का लागले याबाबत पुरावा दाखल नाही. प्रतिवादींनी जाणुनबुजून विलंब व्हावा म्हणुन दिर्घ कालावधीने कैफियत / म्हणणे दिले आहे. प्रतिवादीस कायद्याची माहिती नाही असे म्हणता येणार नाही. सदर अर्जासोबत विलंब माफीबाबत ठोस सबळ कारण नमुद नाही. अर्जासोबत दिलेली कैफियत / म्हणणे मुदतीत नाही. सबब अर्ज रद्द करणेत यावा अशी विनंती केली.

३. वादी व प्रतिवादींच्या वकीलांचा युक्तीवाद ऐकला.

४. अर्ज वाचला. दाव्यातील रेकॉर्ड तपासले. प्रतिवादी नं.३ यांना काही महत्वाची जुनी कागदपत्रे, जुने फेरफार व खरेदी दस्त वेळेत न मिळाल्यामुळे कैफियत मुदतीत दाखल करता आले नाही असे कथन केलेले आहे. यावरून प्रतिवादी नं.३ यांच्या

सांगण्यात सत्यता असल्याचे पटते व सदरचे कारण योग्य वाटते. दावा हा निरंतर ताकीदीकरिता दाखल केलेला आहे. प्रतिवादी नं.३ यांची कैफियत अभिलेखावर आलेस वादातील मूळ प्रश्नाची निर्णिती करण्यास न्यायालयास मदत होणार असून त्यामुळे वादीचे कसलेही नुकसान होणार नाही. झालेला विलंब कॉस्ट करुन भरपाई करता येऊ शकते. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. प्रतिवादी नं. ३ यांचा अर्ज हा रुपये ५००/– च्या कॉस्टवर मंजूर करणेत येत आहे.

२. प्रतिवादी नं. ३ यांनी कॉस्टची रक्कम ही वादीला द्यावी.

३. कॉस्टची रक्कम वादीला दिल्यानंतर प्रतिवादी नं. ३ यांची कैफियत अभिलेखावर घेण्यात यावी.

ANANT RADHAKISHAN TENGSE
Digitally signed by ANANT RADHAKISHAN TENGSE
Date: 2023.06.27 17:14:45 +0530

आटपाडी                (अनंत रा. टेंगसे )
दि. २७/०६/२०२३                सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, आटपाडी.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file judgment/order are same, word to word, as per the original Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | A.A.Jamadar (L.G.) |
| Court. | : | Jt. Civil Judge,Jr.Dn., Atpadi. |
| Date. | : | 27.06.2023. |
| Judgment/order signed by the Presiding Officer on. | : | 27.06.2023. |
| Judgment uploaded on. | : | 27.06.2023. |